# प्रेसनोट

दिनांक १६/०१/२०१९

**पो.स्टे. भाग्यनगर नांदेड, संलग्न उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय नांदेड (शहर) डिव्हीजन डी. बी. पथकाचे पोलीस शिपाई वैजनाथ पुंडलीक पाटील, यांनी ३०,०००/–रुपये लाचेची मागणी केल्या बाबत नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गुन्हा दाखल**

दिनांक ०३/०१/२०१९ रोजी यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, ''तक्रारदार यांचे विरूध्द उप विभागीय पोलीस अधिकारी नांदेड (शहर) येथे चालु असलेल्या चौकशी प्रकरणात तक्रारदार यांचा सोयीचा अहवाल सादर करणेसाठी पोलीस शिपाई वैजनाथ पाटील हे ५०,०००/–रू.लाच मागत असल्याची तक्रार दिली''.

तक्रारदार यांचे तक्रारीवरून दिनांक ०३/०१/२०१९ रोजी लाचलुचत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये पोलीस शिपाई वैजनाथ पाटील यांनी तक्रारदार यांचे विरूध्द उप विभागीय पोलीस अधिकारी नांदेड (शहर) येथे चालु असलेल्या चौकशी प्रकरणात तक्रारदार यांचा सोयीचा अहवाल सादर करणेसाठी ५०,०००/–रू.लाचेची मागणी करून तडजोडीअंती ३०,०००/–रू. स्विकारण्याचे मान्य करून लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले म्हणुन दिनांक १६/०१/२०१९ रोजी आरोपी लोकसेवक वैजनाथ पुंडलीक पाटील, पोलीस कॉन्स्टेबल ब.नं.६१३ नेमणुक पोस्टे भाग्यनगर नांदेड, संलग्न उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय नांदेड (शहर) डिव्हीजन डी.बी.पथक नांदेड यांचे विरूध्द पोलीस ठाणे भाग्यनगर नांदेड येथे गुन्हा रजिस्टर नंबर १४/२०१९ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक संशोधन अधिनियम २०१८ नुसार गुन्हा दाखल करून तपास पोलीस निरीक्षक सुनिता शिंदे, लाचलूचपत प्रतिबंधक विभाग नांदेड हे करीत आहेत.

तरी सर्व नागरीकांना अवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिती असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमाकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन क्रमाक :– १०६४ (२) कार्यालयाचा फोन क्रमाक ०२४६२–२५३५१२
३) श्री विजय डोंगरे, पो.उप अधि.यांचा मोबाईल क्रमाक ८९७५७६९९१८

Website :- www.acbmaharashtra.gov.in, Mobile App :- www.acbmaharashtra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

( विजय डोंगरे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.